॥ श्रीगजानन समर्थ ॥



# महाराष्ट्र-गीत.

भाग १ ला.

शंकर गजानन पुरोहित. बी. ए.

आवृत्ति पहिली.

( सर्व हक्क स्वाधीन )

किंमत १ आणा.

शके १८२७—सन १९०५.

सि० सि० आर्फनेज छा० छा०

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| | | पान. |
| १ | नमस्कृति-गीत .... .... .... | १ |
| २ | जय! स्वतंत्रते! .... .... .... | ३ |
| ३ | टोपीवाला! .... .... .... | ४ |
| ४ | शिव-गीत .... .... .... | ५ |
| ५ | बोध-सुधा .... .... .... | ६ |
| ६ | महाराष्ट्र-सुंदरी .... .... .... | ८ |
| ७ | जागृति-गीत .... .... .... | १० |
| ८ | पारतंत्र्य-गीत .... .... .... | १४ |
| ९ | दुर्दैवाचा फटका .... .... .... | १४ |
| १० | प्रार्थना .... .... .... | १६ |
| ११ | मावळे! .... .... .... | १७ |
| १२ | सूर्याजीचे भाषण .... .... .... | १८ |
| १३ | मोक्ष-देवते! .... .... .... | २१ |

॥ श्री ॥

# महाराष्ट्र-गीत.

## नमस्कृति-गीत.

नमो देशबंधो ! नमो धर्म-बंधो !
नमो कर्म-बंधो ! नमो कार्य-बंधो ! ॥
नमो हास्यबंधो ! नमो दास्यबंधो !
नमस्कार माझा असो आर्यबंधो ! ॥ १ ॥
नमो मातृभूमी ! जिथें जन्मलों मीं ।
नमो पुण्यभूमी जिथें वाढलों मीं ॥
नमो दुःख-भूमी जियेच्याच कामीं ।
पडो देह माझा; सदा ती नमी मीं ॥ २ ॥
नमो आर्यधर्मा ! नमो नित्यधर्मा ।
नमो सर्व धर्मांचिया मूळधर्मा ॥
जयासाठि लोकीं जगावें, मरावें, ।
तरावें भवीं, त्या नमावें, भजावें ॥ ३ ॥
नमो शारदा-वंद्य-पादाम्बुजातें ।
नमो पुंडरीकासनासुन्दरीतें ॥
नमो जान्हवी-पुण्यतीर्थोदकातें ।
नमो देवगंधर्वयक्षोरगातें ॥ ४ ॥
नमस्कार स्वातंत्र्य-देवीपदातें ।
हरी जी स्वभक्तांचिया आपदांतें ॥ ५ ॥
जिथें पारतंत्र्याचिया शृंखळातें ।
मुळीं वाव नाहीं, नमस्ते ! नमस्ते ! ॥ ६ ॥

नमो अस्त्रविद्ये ! नमो शस्त्रविद्ये !
नमो शौर्यविद्ये ! नमो धैर्यविद्ये ! ॥
नमो आदिशक्ते ! नमो सर्वशक्ते !
भवानी नमो कालिके ! चण्डिमाते ! ॥ ६ ॥
नमो रामदासाग्रजे संतमाळे ! ।
नमो मावळे युद्ध–तीर्थी निमाले ॥
नमो म्लेंच्छ–संहार–शील–द्विजाते ।
नमो आर्यराणा शिवाजी नमस्ते ! ॥ ७ ॥
जयीं देशकार्यी, तसें धर्मकार्यी ।
फिरंगी–तुरुष्कांचिये मृत्युकार्यी ॥
रणीं अर्पिलें प्राण त्या धार्मिकांना ।
नमस्कार माझा असो पूर्वजांनां ॥ ८ ॥
जयांचेनि वीर्यें असें जाहलो मीं ।
जयांचेनि पुण्यें जगीं वर्ततो मीं ॥
तयांचें प्रसादें स्वकर्तव्यकर्मी ।
झिजो देह माझा, सदा त्यां नमीं मीं ॥ ९ ॥
नमो क्षेत्रतीर्थें नमो दुर्गराजे ।
नमो वृक्षपाषाण देशांत जे जे ॥
स्वतंत्रें जगीं वर्तुनी गीत गाती ।
नमस्कार माझा तया पक्षिजाती ॥ १० ॥
नमो सौख्यकर्ता ! नमो दुःखहर्ता !
असे चातकां मेघ जेवीं तृषार्ता ॥
तुझ्यावाचुनी कोण तारी अनाथां ।
पदी 'शंकरा' ठाव दे विश्वनाथा ! ॥ ११ ॥

केसरी ता० २२ नोव्हेंबर १९०४.

---

## जय ! स्वतंत्रते !

( धन्य जाहला— )

कालिदेवते ! जयतु जय ! स्वतंत्रते ! ॥ धृ० ॥
दैत्यरुधिर मळवट युत ।
अति भीषण भाल दिसत ।
रक्तनयन । उग्रवदन ॥ चण्डिदेवते ॥ १ ॥
धग धग करिं खड्ग धरीं ।
शत्रु–उरीं कंप भरी ।
असुरहनन । म्लेंच्छ-कदन ॥ करिसि नित्य तें ॥ २ ॥
वक्षःस्थलिं बहु कराल ।
रुळत शत्रु–रुंडमाळ ।
संत शरण । करिसि अवन ॥ भुवन–वंदिते ! ॥ ३ ॥
दास्य–शृंखळा खळखळ ।
दर्शनेंच तुटति प्रबळ ।
शत्रुदलन । दास्यहरण ॥ ब्रीद मिरविते ॥ ४ ॥
स्वातंत्र्यास्तव लढती ।
वीर रणीं तेथ वसती ।
तव अनुदिन । करिति ध्यान ॥ समर–शूर ते ॥५॥
मांसाशन रुधिरपान ।
प्रेतासन सुखद शयन ।
दुःखशमन । सौख्यमिलन ॥ होय सहज तें ॥ ६ ॥
असुर मातले अपार ।
भूमिस हो दुःखभार ।
बघसि किती । अंत अती । मातृ–देवते ! ॥ ७ ॥

## टोपीवाला •

( सगुण गुण माया— )

टोपीवाला । पाहुणा घराला आला ॥ धृ० ॥
पायीं तुडवी थोर नृपावळी ।
थय्‌थय्‌ नाचे भरतमंडळी ।
दुःख किती ते लिहिलें भाळीं । नकळे मजला ॥ १ ॥
नररक्ताचा तिलक कपाळीं ।
मदिरेची ती लाली गालीं ।
मृत्युलालसा नयनीं भरली । पुरवायाला ॥ २ ॥
असिधारा–व्रत नित्य घेतलें ।
कुक्षीमाजी देश दडपले ॥
कौटिल्याचें पूर लोटले ॥ कारि शिण आला ॥ ३ ॥
बकध्यान तें दिसे भयंकर ।
द्वैत साधुनी चतुरें सत्वर ।
उदरीं नेलें आर्य सुखागर ॥ घातला घाला ॥ ४ ॥
सङ्गराङ्गणीं क्लीब रडविले ।
कीर्तिरवाचें शंख फुंकिलें ।
दुंदुभिनादें वीर्य लोपलें ॥ सुखवश झाला ॥ ५ ॥
हालाहल उदरांत निर्मिलें ।
मधुपीयूषा अधरीं बसविलें ।
जिव्हालौल्यें कर्ण लांबले ॥ बंदरवाला ॥ ६ ॥
वैश्यवर्ण हा पूर्वा–श्रमिचा ।
दिसे लाडका परिदैवाचा ।
सिंहासनिं बघ बैसे साचा ॥ धन्य जहाला ॥ ७ ॥
भटास दिधली जेव्हा ओसरी ।
समया पाहुनि पाया पसरी ।

साम्राज्याचा डंक विषारी ॥ मारिता झाला ॥ ८॥
प्रौढी मिरवे शस्त्रास्त्राची ।
साम्राज्याची हौस मनीची ।
जाळायास्तव सुखें जगाची ॥ शूर निघाला ॥ ९ ॥
हातें रगडीं, पायीं भरडी, ।
आर्य जनाची पुराण पगडी ।
स्वातंत्र्याची दावी नरडी ॥ प्रमुदित झाला ॥ १० ॥
हाय ! हाय ! हतदैव कपाळा ।
कोठुनि आणिले अशा नराला ।
मधुर विषानें मारि जगाला ॥ टोपीवाला ! ॥ ११ ॥

---

## शिव—गीत.

( थोर तुझे उपकार—आई ).

धन्य शिवाजी थोरा नृपनर धन्य शिवाजी थोर ॥धृ०॥
यवनपीडिता अवनी बघुनी ।
कर–कमलावरि शिर घेवोनी ।
धावे सत्वर शिव उद्धरणीं॥प्रभु नरसिंह-किशोर ॥१॥
दुःखितवदना शरणादीना ।
भारत–वसुधा बाष्पलोचना ।
करुणा भाकी शीघ्रोद्धरणा ॥ गांजिति यवन कठोर॥२॥
जयशाली जयकालि! भवानी ।
प्रचण्ड हरहर गर्जित करुनी ।
म्लेंच्छ धुरंधर असुर दण्डुनी॥समर कर्म करि घोर॥३॥
महाराष्ट्र–सुंदरी कपाली ।
यवन रुधिर शुभ तिलकाल्याली ।

स्वातंत्र्याची करिं ब्रीदावळी॥मिरवे जो रणधीर ॥४॥
तानाजीचा स्वदेश बाणा ।
त्यजुनी समरीं पंच प्राणा ।
यवन मुक्त करि गड कोंढाणा॥सिंह हरपला शूर ॥५॥
गडी मराठा मुरार बाजी ।
धीर मावळा रणिं येसाजी ।
प्रभु पासलकर अजिंक्य गाजी॥स्वदेशकार्यीं चूर ॥६
खड्ग–धनुर्धर परार्थ–तत्पर ।
धारातीर्थी श्री अजरामर ।
मिळवुनि सेविति मोक्ष निरंतर॥किति वानावे वीर ॥७
शिव चरणातें भावें ध्याऊं ।
आनंदानें गाणीं गाऊं ।
उन्नति–पंथा काळें जाऊं ॥ धन्य धन्य शिव थोर॥८

---

## बोधसुधा.

( चाल रीत सारी गेली— )

भरतभूमि बुडते तारा । लाज ना तुह्मा हो ॥ धृ० ॥
धन्य थोर शिवबा राणा ।
समरिं मरण ज्यांचा बाणा ।
मावळे तयाना नाणा ॥ मानसीं कधी हो ॥ १ ॥
रामदास गुरुची वाणी ।
मधुर–बोध–मणिमय खाणी ।
घाव हृदय–मर्मी हाणी ॥ विसरले तया हो ॥ २ ॥
आर्यभूमि–पदतळिं रतले ।
म्लेंच्छभार–हरणीं मेले ।
अंतिं ईश–चरणीं नटले ॥ पूर्वजा स्मरा हो ॥ ३ ॥

धर्ममार्ग कैसा त्यजिता ।
अधममार्ग कळुनी वळता ।
पुण्यमार्ग नच आचरितां ॥ दु:ख तें मिळे हो ॥ ४ ॥
दीनभाव अरिच्या पुढती ।
धरुनि नित्य लोटांगणती ।
दास ह्मणुनि जगिं वावरती ॥ धन्य नरमणी हो ॥५॥
माय–धेनु–रुधिरा पाहे ।
स्वजन–दुःख–भारा साहे ।
परस्तवनिं जिव्हा वाहे ॥ नाकळे कशी हो ॥ ६ ॥
धैर्य शौर्य कोठें गेलें ।
स्वाभिमान साहस नुरले ।
भ्याड हृदयिं कैसें झाले ॥ अवदशा अशी हो ॥ ७ ॥
‘ धर्म–वैरि तितुके कुत्ते ।
घालि मारुनिया परते ’ ।
झुंज घातलीया वरतें ॥ यश न तें कसें हो ॥ ८ ॥
‘ तेज थोर चळवळींचें ’
रामदास कथिती साचें ।
‘ अधिष्टान जरिं ईशाचें ’ ॥ यशनकां मिळे हो ॥९॥
‘ महाराष्ट्र जन मिळवावा ’
एकजीव सकल करावा
कार्यभाग मग उकरावा ॥ यश न मग कसें हो ॥१०॥
भक्त–पाळ रिपुगण–हंता ।
दावि तोचि सुखकरपंथा ।
दीनवत्सला भगवंता ॥ शरण त्या रिघा हो ॥ ११ ॥

## महाराष्ट्र-सुंदरी.

( वीरा भ्रमरा— )

महाराष्ट्र-सुंदरी विलसते ब्रह्माण्डीं माउली ।
स्मृतिगत-सौख्याची साउली ॥ धृ० ॥
इन्दुवदन हें आनंदानें दुःख-जळदिं रंगलें ।
ह्मणुनी जन बहु हर्षावले ॥
कपोलभागीं स्वच्छंदानें बाष्पपूर लोटले ।
कृषिवल तेणें आनंदले ॥
केशकलाप-स्नेह पूर्वीचें अस्तंगत जाहले ।
जीवन-कलहातें फावले ॥
॥ दास्यत्वकुकुंमा गण्डस्थलिं लाविलें ॥
॥ दुर्भाग्य-हरिद्रा निम्नभागिं रेखिलें ॥
॥ ऐश्वर्य मूर्त परिपूर्ण मनीं बाणलें ॥
परोपरीनी नटुनी थटुनी भरतभूमि सजविली ।
किती तरि सुंदरशी दिसली ॥ १ ॥
इंद्रनील-मणि-खचित-मंचकीं शय्या अव्हेरिली ।
प्रेमें धरणीवर पहुडली ॥
चंदन-चर्चन, केशर-लेपन, शृंगारा सोडिले ।
शीतल पवनातें वरियलें ॥
अमूल्य वसनें, रत्नाभरणें, निखिल हाय टाकिली ।
मजला योगिनि जणु भासली ॥
॥ जीर्णता-दुकूला अंगावरि वेष्टुनी ॥
॥ दारिद्र्यहार सितकंठीं शुभ घालुनी ॥
॥ परावलंबन तांबूला खाउनी ॥
कनककंदली-कोमल-काया पाण्डु कृशा भासली ।
तेणें सिंहकटी शोभली ॥ २ ॥

सार्वभौमिनी सिंहासनिची सद्गुण-गणशालिनी ।
बिळसे पंजरिं ती भामिनी ॥
अभिनव-नलिनीदल-करिं कांचन-भूषण नच शोभलें ।
आयस-कंकण मग घातलें ॥
नंदनवन-सुख स्वातंत्र्याचें आनंदें सोडिलें ।
मानस परवश तें जाहलें ॥
॥ स्वत्वा सोडुनि अद्वैता बाणले ॥
॥ आपपराचें भाव पहा विरमले ॥
॥ ब्रह्मानंदीं मन मोदें रंगलें ॥
खड्गपरशुधर-कर पर ज्यांनीं चरचर रणि कापिलें
गोमुखिमाजी ते बैसले ॥ ३ ॥
रणझुंझारीं घोर संगरीं प्राणातें तर्पिलें ।
त्यांहीं मौनातें साधिलें ॥
अश्रुबिन्दुनें रिपुशिरशत ते रणकुंडी अर्पिले ।
त्यांहीं प्रखरत्वा सोडिलें ॥
ऐश्वर्याचें भगवे झेंडे अटकेवरिं रोविले ।
तेही कालमुखीं लोपले ॥
॥ कोठची स्थिती ती घोरतमा निर्दया ॥
॥ शांति-समुद्रीं अवगाहन व्हावया ॥
॥ क्लैब्य वरें मग पुरुषत्वाचि कांसया ॥
ऐशी निर्गुण ! निराकार ! ती निर्विकार ! माउली ।
स्मृतिगत-सौख्याची साउली ॥ ४ ॥

## जागृति–गीत.

( थाळा जो ओ रे. )

जागृत हो बाळा । वेल्हाळा । गोब्राह्मण–प्रतिपाळा ।
निद्रा किति घेशी । शिवबाळा । सज्जन–हृदय मराळा ॥धृ॥
राज्य लया गेलें । हास्याचें । सुदिन पहा मावळलें ।
पुनरपि आर्यांचें । हतदैवें । नष्टचर्य पातलें ।
गायी हंबरती । दुःख–भरें । ब्राह्मण ते तळतळती ।
वाली नच उरला । धर्माला । शरणहि तव चरणाला ॥१॥
शूर–महाराष्ट्रीं । स्वातंत्र्य । सूर्य–तेज मावळले ।
एकाकीं दैवें । परकीय । दास्य–तिमिर फांकलें ।
दुष्काळीं जन । तार्डालें । दारिद्र्यें गांजियलें
भक्तजना तारी । यवनारी । कितिक आळवूं तुजला ॥२॥
स्वर्गी पूर्वज । हतभागी । ढाळिति अश्रू नयनीं ।
सुरमुनि–गंधर्व । किन्नर । दुःखित झाले गगनीं ।
दैत्य महाप्रबळ । मातले । तत्पर सुर–संहरणीं ।
भारतभूमी ही । दीनपणें । शरण येतसे तुजला ॥ ३ ॥
दुःखद ही रजनी । संपोनी । सुखद किरण फांकलें ।
उघडी नयनाला । आनंद । मधुरगंध हें सुटले ।
बन्दीजन गाती । आकाश । दुंदुभिनादें भरलें ।
अंत किती बघसी । कधि येशी । स्वजना सुखवायाला ॥४

---

## पारतंत्र्य–गीत.

( भुजंग प्रयात )

तुझेचेनियोगें बहू मान्य झालो ।
तुझेनी प्रसादें जगीं धन्य ठेलो ॥

तुझ्या वाचुनी कोण वाली अम्हातें ।
नमः पारतंत्र्या ! नमस्ते, नमस्ते ॥ १ ॥
कृती वर्णितां वेदवाणी शिणेल ।
कवी कोण वाणी न ज्याची थकेल ॥
नमीती तुला ठेवुनी मस्तकातें । नमः–॥ २ ॥
पिता तूंच माता सखा तूंच लोकीं ।
तुझ्या सारिखा बंधु नाहीं त्रिलोकीं ॥
तुझ्यावीण आह्मीं न जाणीत नातें । नमः–॥ ३ ॥
सख्या तूझिया द्वैत नाहीं मनांत ।
करी कोण तूझी सरी या गुणांत ॥
विसावा जगीं तूंच दुःखी मनाते । नमः–॥ ४ ॥
पराचें पुढें दीनभावें नमाया ।
अजीजी सदा त्यापुढें स्वीकराया ॥
तुवा शीकवीले किती वानु तूते । नमः–॥ ५ ॥
बसे एक गाली तरी दूसरा तो ।
कराया पुढे गाल आह्मी न भीतो ॥
असें श्रेष्ट–धारिष्ट ये मानसाते । नमः–॥ ६ ॥
नसे एकलत्ता दुजी खावयाला ।
अती मानसीं दीसतो हा भुकेला ॥
कधी सोडिना अंतरीं शांततेते । नमः–॥ ७ ॥
हजारो युगांतीं तपाते करोनी ।
निराहार राहे मुनी घोर रानीं ॥
उपाशी तपावीण ये राहण्याते । नमः–॥ ८ ॥
नसे खावयाला पुरेसे कधीही ।
कुठे वस्त्र लेणे अलंकार पाही ।
अयासाविणें जिंकितो इंद्रियातें । नमः–॥ ९ ॥

क्षमेचें महा–शस्त्र हातीं धरोनी ।
करू दिग्जया श्री अणू ती हरोनी ॥
नको ऐकण्या या पुढे संगरातें । नमः–॥ १० ॥
बरे धैर्य गेलें, बरे शौर्य गेलें ।
बरे हास्य गेलें, बरे दास्य आलें ॥
धरूरे नको तूं अशा दुर्गुणातें । नमः–॥ ११ ॥
नको रानटी धर्म मूढादिकांचा ।
धरू या पुढें मार्ग तो श्वापदांचा ॥
मनःपूत स्वातंत्र्य देशी अह्मातें । नमः–॥ १२ ॥
महा मूर्ख ते मानसीं इच्छितातीं ।
स्वराज्यीं किती नाकळे हाल होती ॥
ध्वजा लाविली एककाळी पुरें तें । नमः–॥ १३ ॥
नको व्यर्थ आयास सायास जीवा ।
सुखाचा मिळे घांस पूर्वीं न ठावा ॥
वरी कोण दुःखा त्यजोनीं सुखातें । नमः–॥ १४ ॥
पुराणीं बहू वर्णिला सेव्य–धर्म ।
तयांतील कोणी न शोधीच वर्म ॥
सदा जोडुनी पुण्य तोडी अघांतें । नमः–॥ १५ ॥
कशाचा तुझा धर्म कैंचा स्वदेश ।
दिशा दाहि यांचा असे कोण ईश ? ॥
त्यजूं या स्वदेशाचिया मृत्तिकेतें । नमः–॥ १६ ॥
कदा काळिं संपत्ति येता घरांत ।
मदोन्मत्त तो निंद्य होई जनांत ॥
नको वीष ते दूर नेई दिगन्ते । नमः–॥ १७ ॥
दिलें विश्व आह्मां इनामांत सारें ।
कुठेंही घरीं घेउनी झोळि जारे ॥

असें बाणलें पूर्ण वैराग्य मातें । नमः– ॥ १८ ॥
क्षुधा कासया ती जळो नांव तीचें ।
तिनें हाल केलें बहू या जगाचें ॥
धरूं योग–मार्गा करूं साधनातें ।नमः–॥ १९ ॥
असे घोर संसार निःसार बापा ।
सदा जोडिसी व्यर्थ कां थोर पापा ॥
कधी सोडु आह्मी अशा मींपणातें । नमः–॥ २० ॥
नसे सत्य कांहीं, असे सर्व माया ।
नसे शक्ति आह्मांत ती ओळखाया ॥
तुवा दीधली ती दयाळा अह्मातें । नमः–॥ २१ ॥
पुरे धर्मभक्ती पुरे देशभक्ती ।
पुरे अर्थभक्ती पुरे मोक्ष भक्ती ॥
मिळे सेविता ज्यासि चारी फळातें ।नमः–॥ २२
असें आमचें दास्य हें मोक्षधर्म ।
जयावीण जाणो न ते अर्थकाम ॥
स्वदेशीं सुखी लोटलेसी अह्मातें । नमः–॥ २३ ॥
दयानीति शांती क्षमा आर्जवातें ।
समाधान ऐसा वरी सद्गुणातें ॥
नसे स्थान शौर्यादिका दुर्गुणांतें । नमः–॥ २४ ॥
नको पुत्रपौत्रादि तो व्याप लोकीं ।
पुरा त्रासलो गांजलो मीं विलोकी ॥
जगीं सर्वही दुःख जावो लयातें । नमः–॥ २५ ॥
कळेना! वळेना मती ती ढळेना ।
मनीं कल्पना अन्यथा येति नाना ॥
परी संकटीं एकला तूं जनातें । नमः–॥ २६ ॥
मनी भाव राहो, घडो नित्य सेवा ।

तुझ्या—साठि हा देह माझा पडावा ॥
विसावा न ठावा तुझ्यावीण माते । नमः—॥ २७
घडो पावना तूझिया दर्शनाते ।
तुझे आवडो वर्णितां सद्गुणाते ॥
झडो पापसारे, तुटो बंधनाते । नमः—॥ २८ ॥
खरा पारतंत्र्या ! गुरू भेटलासी ।
कितीका परींनी जना शीकवीसी ॥
प्रभो मार्ग तो शीघ्र दावी अह्माते ॥ नमाः—॥२९
दासत्वाची नयनिं दिसते नित्य ती रम्यमूर्ती ।
अभ्यासोनी गुणगण तिचे साधिजे हेतुपूर्ती ॥
सापेक्षत्वें कळुनि वळुनी जेधवा ज्ञान होई ।
एकाएकी कुमति-जनित-ध्वांत तें दूर जाई. ॥ ३०

---

## दुर्दैवाचा फटका.

( विकट वाट वहिवाट— )

आनंदाचा दिवस सुखाचा येइल साचा कधीतरी ।
दीन-जनांचा पालनवाला सकल खलांचा नाश करी ॥ध्रु०॥
गळे झोपडी घडी घडी परि बहू आवडी वसे मनीं ।
कटि लंगोटी पोट खपाटी ही परिपाटी सकल जनीं ॥
ढिगळांची ती कळाविहीना वाकळ खाद्यांवरी वसे ।
जीर्णहि खासें तें मुंडासें कसें बसें तरि शिरीं वसें ॥
उदरपोषणा अन्न मिळेना यत्नहि नाना जरी करी ।
दास्यनियोगें हास्य लोपले उदासीनता मनीं वरी ॥
सतेजवदनीं तेज लोपुनी भेसुर नयनीं भूत जसें ।
लाल गालिची लाली जाउनी खोल जहाले पहा कसे ॥
कधी सुखाचा घांस मिळेना मांस कोठचें तुम्हा दिसे ।

दारिद्र्याचा वास घरीं मग फांस गळ्याला उणा नसे ॥
दानवंचना बहु करितांना मानखण्डना परोपरी ।
परांपुढती मान नमविणें अपमाना ह्या सहन करी ॥
अशनीं कोंडा, शयनीं धोंडा, मनांत मांडा सदा वसे ।
हाय कपाळा! निर्दय वेळा, गोपाळा ! तुज दया नसे ॥
धनी उपाशी चाकर खाशी करी मिजाशी धनावरी ॥१॥
मराठशाही पेशवाइची अखेर होई पहा कशी ।
दुर्दैवानें पाठपुरविली सुखें लोपलीं धुकें जशी ॥
शौर्य लोपलें धैर्य निमालें वीर्यहि गेलें कसें पहा ।
करी परांच्या राज्य बुडालें जगांत होई हंसे म्हा ॥
क्षत्रापासुनी त्राण कराया क्षत्रियांत मुळि जीव नसे ।
मान सोडिला भान नसे त्या श्वानवृत्ति ती मनीं वसे ॥
शापनियोगें शरसंधानें अरितें मरणें प्राप्त घडे ।
सव्यसाचि ते ब्राह्मण गेले दास्य–सेवनीं मती जडे ॥
देश बुडाला धर्म लोपला कली मातला महाबळी ।
शूद्रांचा तो मळा पीकला द्वेष मांडिला कसा खळीं ॥
भारतभूमी व्यसनकर्दमीं लोळे नयनीं नीज परी ।
मती वळेना कृती घडेना जागृति केव्हां हाय खरी ॥
मटो आमुचें वेळू गिळती परि मागुती जाणवती ।
दो दिवसाची हौस मनीची पुरवा पुढती तीच गती ॥
प्रजा गांजली मजा पाहती खास नव्हे ही रीत बरी ॥२॥
यारे यारे बांधवसारे एकविचारें कार्य करूं ।
फूट तोडुनी जूट करोनी सदा सुखाला चला वरू ॥
माज सोडुनी काज करूया खाज खळांची जिरवुनीया ।
जीवन–संगरिं झुंज घालुनी पतन करूया ही काया ॥
'भक्तासाठीं तो जगजठी' कृष्णासाठीं उभा असे ।

संसाराच्या पैल-तिराला स्मरुनी त्याला जाउ कसे ॥
अनाथ दुबळे अंध पांगळे वेगवेगळे दीन खुळे ।
मायभूमिची सकलहि बाळे एक करूया भीम बळे ॥
संघ-बळाते एकवटोनी मार्ग गाठुया संथपणे ।
घातपात तो पुरे जहाला देश बुडाला याच गुणें ॥
देशद्रोहा धर्मद्रोहा स्वजनद्रोहा पुरे करा ।
लोभ-मोहमद-मत्सर-मोहित सर्व जनांचा गर्व हरा ॥
राज्यसुखाची ऐश्वर्याची मंगलमूर्ती मनीं धरा
निशिदिनि नयनीं अशनीं शयनीं स्वतंत्रतेचें ध्यान करा ॥
भक्ता वरदायिनी भवानी धांवत येऊनि व्यसन हरी ॥
आनंदाचा ॥ ६ ॥

---

## प्रार्थना.

( श्वानाहुनि तुम्हि नीच अतीरे- )

दीन! दयाळा! पतितपावना! विघ्ननाशना! भयहरणा ।
हिमनगदुहितोत्संगविहारी शंभुनंदना करु नमना ॥ धृ०
मदोन्मत्त होउनी विसरलो पदा तुझिया गणराया ।
ह्मणुनि दशा ही घोर पातली कृपा करिशिरे कधि सदया ॥
शरणागत मीं तव चरणाची करुणा भाकी गजवदना ।
अंत कितीरे बघसि दयाळा उशिर कासया रिपुहनना ॥
॥ अन्नान्न दशाही झाली ॥
॥ अवदशा घरासी आली ॥
॥ पंकांत भरतभू ठेली ॥
भक्त मनोरथ कल्पतरू हे नाम सार्थ जगिं करिशि कदा ।
विपदा हरुनी राष्ट्र-संपदा-दान शीघ्र दे सुखरदा ॥ १ ॥
तूं करुणेचा सागर ह्मणविसि ह्मणुनि सांगतो दुःख तुला ।

अधम जनापुढती कधि नलगे सफल याचना जरि मजला ॥
उत्कंठेनें चातकगण हा जललव याची प्रभुराया ।
दीनदयाघन वळशिल केव्हां, सरली अवघी कां माया ॥
॥ विसरलों मातृभूमीला ॥
॥ विसरलों आर्यधर्माला ॥
॥ विसरलों ईश–चरणाला ॥
सुरवरवंदित तवपद–पंकज सेवेमाजी ही काया ।
भक्तपालना! नित्य झिजावी हेंचि मागणें शिवतनया! ॥ २ ॥

---

## मावळे!

( नृपममता रामावरती – )

धन्य ते मराठे भाई । लढले जे निजधर्मार्थ ॥ मावळे ॥
गाजली स्वदेश–प्रीति । रणरंगी केली ख्याती ॥ मावळे ॥
वेचिलें प्राण वीरांनीं । आनंदें धारातीर्थीं ॥ मावळे ॥
स्वातंत्र्य–देवता–चरणीं । रिपुरुधिरा अभिषेकीती ॥मावळे॥
गांजले । स्वजन आपुले । बघुनि धावले ।
चंडसंपातें ॥ हाणिती यवन–सैन्यातें ॥ मावळे ॥ १ ॥
शयनास घोर रणभूमी । पांघरण्या नीलाकाश ॥ मावळे ॥
उदराची नलगे चिंता । पर्वत जळ नित्य पिण्यास ॥मावळे ॥
कटिवसनहि लंगोटीचें । मुंडास शिरस्त्राणास ॥ मावळे ॥
उद्योग राष्ट्र धर्माचा । लागला अनुदिनी ध्यास ॥मावळे॥
रणधीर । समर–झुंझार । म्लेंच्छ–संहार ।
करुनि भूमीते ॥ संतुष्ट करित होत्साते ॥ मावळे ॥ २ ॥
अवतार जगीं मदनारी ॥ शिवराज नेइ समरांत ॥मावळे॥
उपदेश रामदासाचा । बाणला पूर्ण हृदयांत ॥ मावळे ॥
गोब्राह्मण धर्मासाठीं । यवनास रणीं सहरंले ॥ मावळे ॥

जलकालीं हरहर! शब्दें । नक्षत्राङ्गण दुमदुमले ।। मावळे ।।
समशेर । करीं नरवीर । घेऊनी शीर ।
संगरीं गेले । अंती प्रभुचरणीं नटले ।। मावळे ।। ३ ।।

---

## सूर्याजीचें भाषण.

( सिंहगडावर भयभीत होऊन पळूं लागलेल्या मावळ्यांस उद्देशून ).

रे ! षंढानो ! समरीं विन्मुख होता कसे, चला, परता ।
धन्य धन्य भूमाता प्रसवे ऐशा सुतां ललाटहतां ॥१॥
व्यसनगतां छळविनता भूमाता–मुक्तता करीं असता ।
परघातां जन्म जिचा खड्गलता ती सुयोधनीं त्याजिता॥२॥
कर-कमलीं शिर घेउनि शूर करी कर्म घोर समरांत ।
पर-रक्त-पूर-सिंचित रण-देवी जो करी खरा पूत ॥ ३ ॥
धारा-तीर्थचि ज्यांचा स्वार्थ असे त्या किमर्थ असुभीति ।
स्वर्ग सुखाकां मुकता? अविचारें, मानवी चला वसती॥४॥
ऐहिक बंधन खण्डुनि हृदय करा थोर शूर वीरांचे ।
आर्यजनन्युद्धृत खलु देह तिच्यास्तव पडोत हे तुमचे ॥५
संसार-घोर-रौरवें पौरनरांनां सुखें पचूं द्या हो ।
यवन–पीडिता अवनी–जननीचे पांग आजि फेडा हो॥६॥
रण–झुंझार ह्मणविता रिपुकुलकटकांस आज वांचविता ।
धेनू–हरणीं गाजे कीर्ति अशा उत्तरासि लाजविता ॥७॥
अर्धाङ्गी खड्गलता म्लेंच्छत्रस्ता तशी जगन्माता ।
कीर्ति-द्रविणाचि तुमचें एकाकी ह्मास हो कसें त्याजिता ॥८
हरहर गर्जा घाला खड्गासी हात हो करा गिल्ला ।
या अल्ला! बिसमिल्ला! करुदे यवनांस वेउ हा किल्ला॥९
नामो-हरम करूं या रणधूळी चारु या यथा-तृप्ति ।
डेरा पैंगबरका दाऊया सत्वरी चल्ला वरती ॥ १० ॥

कर्दन काळ जगाचे पूर्वज तुमचेहि आज घटकेला ।
पवनरथान्तरिं बैसुनि वानिति पुरुषार्थ फार हा केला ॥ ११
धिःकार जिणें तुमचें अधानो! शौर्य करितसा काय ?।
कीर्ति-मन्दिरा हस्ते अंगारा लाविता बळें हाय! ॥ १२ ॥
वीर-मराठे-कुलमणि अनर्थ असती पलायनीं शूर ।
पूर्वज नयन पराक्रम देखुनि वमतील अश्रुचे पूर ॥ १३ ॥
सज्ज विमानीं गगनीं अभ्यङ्गस्नान करुनि सुर-रमणी ।
सङ्गरपतन-पवित्रा वरण्यातें कीर्ति-सुमन-हारांनीं ॥ १४ ॥
आर्य-जनास्तव निर्मिलि भारत—भूमी त्रिलोक—कल्यानी ।
काय हरावें तिजला देखत ह्या रक्तवदन चोरांनीं ॥१५॥
चरचर कांपिती धेनू हंबरडे हीन दीन होवोनी ।
मन्दिरीं जाउनि अमुच्या टाकिति हे देवमूर्ति फोडोनी॥१६
ब्रह्मवृंदा करिती एकाकी भ्रष्ट हे शिखानष्ट ।
गोजिव्हा-पुष्टतनू दुष्ट करा हो जगांतुनी नष्ट ॥ १७ ॥
पातिव्रत्य धनाते चोरिति परि साहता कसें तुह्मिरे ।
लत्ता-प्रहार करुनी सत्वर ह्या दाखवा निरय-विवरे ॥८॥
शेंफरले बहु कृत्यें करुनि अनन्वित जगांत हे मत्त ।
प्रायश्चित्त तयाना द्याया निर्धार अजि करा सत्य ॥१९॥
स्वातंत्र्यास्तव सांप्रत गोब्राह्मण आर्यधर्म रक्षाया ।
त्वत्वा करितां सङ्गरिं बाहुबळें शौर्य गाजवा या, या॥२०॥
पितरमुनी देवादिक ऋृण फेडा सर्वही प्रसंगी या ।
मातृ—भूमिचे रक्षणिं क्षणभंगुर अर्पुंया अजीकाया ॥२१॥
गङ्गाधवलतरङ्गनबुब्दुदवपु यवनशोणितीं पूर्ण ।
माखुनिया शौर्यानें स्वर्गकपाटें करू खुली तूर्ण ॥२२॥
घ्या माघार गड्यानो ! फिरवा वदनें रिपूंवरि घसरा ।

निमिषार्धांत तयांच्या सेनेवरि वज्रजाल हे पसरा ॥२३

स्मरुनि जिजाई देवी तनय जिचा थोर सांभ अवतार ।
धन्य शिवाजी राजे नामाचा त्या तुह्मीं करा गजर ॥२४॥
प्रभुरामदास गुरुचें आणा सामर्थ्य मानसी थोर ।
जगदंबेते स्मरुनी हरहर करुनी लढोनि व्हा अमर॥२५॥
धैर्य धरा, शौर्य वरा, ठार करा, ह्या परां, त्ररा हेत ।
विजयश्री रमणीतें वरुनी सार्थक कराच समरांत ॥२६॥
अथवा कांपा गर्दन घ्याही तलवार शेवटी माझी ।
कुजुनी झडुनी शौर्यैं अंत करा दास्यरौरवांमाजी ॥२७॥
निर्वाणिचें ऐकुनि सूर्याचें शल्यवचन हें कानीं ।
हलकल्लोळा करुनी एकाकी फिरविली पदे त्यांनीं ॥२८॥
झंझावातासम ते गर्जति रिघती रिपूवरी जेव्हां ।
भीषणकोलाहलरव मूर्च्छागत शत्रुसी करी तेव्हां ॥ २९ ॥
शस्त्रास्त्रें खणखणती बोभाटति वीर तेथवा सारे ।
डळमळले ब्रह्माण्डहि रिपु वदती हाय हाय तोबारे ॥३०
कर गळती, पद पळती, ग्रीवा झडती, किती असी तुटती।
जेथुनि आले असती तेथ ते मातृधूलिते मिळती ॥ ३१ ॥
एकाकी घट भरता पापाचे धूळ खात पडती ते ।
सत्यसुमार्ग जयांचा मिळती ते खास विजय-लक्ष्मीते ॥३२
भुजबलहतरिपुरक्तीं सूर्यानें माखिली स्वभूदेवी ।
परशृंखला तुटोनी देशोद्धारक जगीं सदा मिरवी ॥ ३३ ॥

---

## मोक्षदेवते !

( उद्धवा शांतवन कर जा— )

हे मोक्ष देवते ! येई । दर्शन सुख पतितां देई ।। धृ० ।।
छळवादें अरिच्या नित्य । वाहती अश्रुचे पूर ।।
निशिदिनीं अधोगति बघतां ।लागली मना हुरहूर ।।
दिङ्मूढ जाहले कैसें । चिंतातुर मानस थोर ।।
।। सिकता-गृहिं बसलो दिसते ।।
।। मायावृत जग हें फिरतें ।।
प्रत्येकपदीं डळमळते ।। तिळमात्र सौख्य इह नाहीं ।। १
क्षणभंगुर सौख्यां भुलुनी । शाश्वतास कैसा मुकलो ।।
ऋषि-संपादित-कीर्तीतें । विसरुनी अजागल झालो ।।
फेकुनी रत्न तें कारिंचें । पाषाण घेउनी ठेलो ।।
।। ना कळे कशी मति चळली ।।
।। अवदसा मनीं आठवली ।।
पंकांत धेनुही रुतली ।। झडकरि इज पदरीं घेई ।। २ ।।
तारुण्य-पूर्ण-रुधिरानें । अभ्यङ्गस्नान घालीन ।।
शुभ-पूत-चर्म-वसनानें । जगदंबे ! वपु झांकीन ।।
माझिया शिरः-कमलातें । आनंदें पदिं वाहीन ।।
प्रियकर ह्या पंचप्राणा । नैवेद्यास्तव देईन ।।
।। का सत्व वृथा मम बघसी ।।
।। प्राणान्त कासया पाहसी ।।
अति निष्टुर हृदया करिसी ।। हा दीन शरणगे पायीं ।। ३ ।।
जय ! मोक्षदेवते ! येई ! उद्धरी यास लवलाही ।।

---

# महाराष्ट्र–गीत.

पुस्तकें खालील पत्यावर मागवावीतः–

**शंकर गजानन पुरोहित. बी. ए.**

२०४ रास्ते पेठ, आकुतांचावाडा,

पुणे सिटी.

व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन मिळेल.

---

॥ श्री ॥

प्रसिद्ध भिषग्वर कै. भाऊ साहेब रंगारी यांचे

दवाखान्यांतील शास्त्रोक्त तयार केलेलीं

**रामबाण औषधें** खालील पत्यावर

मागवा. खुलासा पत्रद्वारें.

**वैद्य काशीनाथ ठकुजी जाधव.**

भाऊ साहेब रंगारी यांचा वाडा.

शालूकराचा बोळ, बुधवार पेठ.

पुणे सिटी.

---

जपानचा— [ कि. ·।· ट. ह. ८८॥ ].

## राष्ट्र–भक्ति–प्रदीप.

लेखक–ज्वालामुखी.

पुणे सदाशिव पेठ, ८१९ } त्र्यंबक गुरुनाथ काळे.